**रस्त्यांवरील अपघात Road Accidents** शब्दांकन -- म. ना. गोगटे (www.mngogate.com)

Attachment (cpar.pdf). Summary of talk by C. Parmar, in Marathi in Devanagari script

इंस्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स पुणे केंद्र व मराठी विज्ञान परिषद पुणे विभाग यानी वरील विषयावर श्री चांदमल परमार यांचे भाषण 18 मार्च 2008 रोजी इंस्टिट्यूशनच्या जागेत आयोजित केले. त्याचा सारांश. परिषदेचे श्री म. ना. गोगटे यानी वक्त्यांचा परिचय दिला. वक्त्यांना इंस्टिट्यूशन स्मृतिचिन्ह कार्याध्यक्ष श्रीमती ज्योत्स्ना चौबळ-देशपांडे यानी दिले. अखेर श्री सुदर्शन तांदळे यानी आभार मानले.

= 1 =

माझा जन्म 1942 मध्ये राजस्थान येथे झाला. तरीपण माझी शिक्षणभूमी व कर्मभूमी पुणे आहे. माझी तरूण कन्या राजश्री हिचे पुण्यात अपघाती निधन एका वाहनामुळे 1989 मध्ये झाले. अपघात होऊच नयेत, व झाल्यास वैद्यकीय मदत त्वरित मिळावी यासाठी माझे चिंतन व सर्वेक्षण सुरू झाले. त्यातून कुमारी राजश्री परमार मेमोरियल फाउंडेशन निर्माण झाले. या फाउंडेशनतर्फे वेळोवेळी रुग्णसेवा आणि प्रबोधन ही कार्ये होत असतात. काही शासकीय समित्यांवर फाउंडेशनला सल्लागार नेमण्यात आले.

= 2 =

2004-05 या आर्थिक वर्षात भारतात रस्त्यांवर 583000 अपघात झाले व त्यामुळे 105000 व्यक्ती मरण पावल्या, 745000 व्यक्ती जबर जखमी झाल्या, व 386000 व्यक्ती अपंग झाल्या. यापैकी सुमारे 66 टक्के लोक कमवत्या 18 ते 50 वयोगटातील होते. अपघातांमुळे कित्येक कुटुंबे उध्वस्त होतात. देशाचे वार्षिक रु 75000 कोटी नुकसान होते. वाहनांचे प्रदूषणजन्य बळी व तोटे हे आणखी वेगळेच. गेल्या 50 वर्षात भारतातील वाहनांची संख्या 109 पटीने, पण रस्त्यांची लांबी फक्त 9 पटीने वाढली.

= 3 =

शासनाकडे कित्येकदा इच्छाशक्तीचा अभाव असतो. तरीही त्यांच्याकडूनच काम करून घ्यावे लागते, पुन्हापुन्हा प्रयत्न करावे लागतात. अपघात झाले व पोलीस तेथे पोचले की त्यानी पंचनामा करायचा असतो. तथापी अपघातस्थळी कोणी जखमी आढळल्यास त्यास रुग्णालयात पोचते करणे हे प्राधान्याचे कार्य फाउंडेशनच्या प्रयत्नामुळे ठरवण्यात आले. त्वरित औषधोपचार रुग्णालयांवरही बंधनकारक झाले.

= 4 =

विविध रस्त्यांचा दर्जा सुधारणे, त्यांची रुंदी वाढवणे, योग्य असे सूचनाफलक उभारणे या बाबतीतही फाउंडेशनने वेळोवेळी शासनाकडे आग्रह धरला. पुतळा बाजूस सारणे सुचवल्यास लोकक्षोभ होऊ शकतो. तरीपण रहदारी सुधारण्यासाठी त्या दिशेनेही आम्ही प्रयत्न केले, प्रदर्शने घडवली, काही शिफारशी केल्या. अपघातप्रवण झाडे कापण्यासाठी वनविभागास आम्ही सूचना दिल्या. आमच्या निस्वार्थी अभ्यासपूर्ण प्रयत्नांना काही यश मिळाले. हायवेवर पोलीसदले, रुग्णवाहिकादले निर्माण झाली. फोन, सिग्नलयंत्रणा आल्या. ट्रकवर सामानाबाबत सूचना हवी, याबाबतही आमचे प्रयत्न होतात. वाहनांचे टायर फुटून अनेक अपघात होतात. त्याबाबतीत आम्ही सूचना देतो. रहदारीबाबत नागरिकांना प्रशिक्षण देतो. खासगीपेक्षा सार्वजनिक वाहने वाढली पाहिजेत. नीट सायकलमार्ग हवेत. स्कूटरवाल्यानी हेल्मेटचा वापर मान्य केला पाहिजे. अपघात टाळण्यात महनीय कार्य करणाऱ्यांचा आम्ही गौरव करतो.

-------------

*संपर्क श्री चांदमल परमार (Mamata group) 289 टिंबर मार्केट, फुले पेठ, पुणे 411042 फोन 9422316071 व (020) 26456871 म. ना. गोगटे (पवन अपार्टमेंट, लक्ष्मी पार्क, नवी पेठ, पुणे 411030 फोन 020-24537574)*